पुण्यासह महाराष्ट्राचा कौल सांगणारा वेगवान डिजिटल अंक

• पुणे, मंगळवार, ०४ जून २०२४

Digital

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com

BEYOND THE NEWS

## युती आणि आघाडी लढत पुणे विभागात बरोबरीत सुटण्याची चिन्हे

# मोहोळ, सुळे, बारणे, कोल्हे विजयाकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सकाळी ११.३० वा जाहीर झालेल्या मतमोजणीनुसार, पुण्यातून मुरलीधर मोहोळ यांना १ लाख ५४ हजार मते मिळाली, तर रवींद्र धंगेकर यांना १ लाख २० हजार मते मिळाली आहेत. बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळे १४ हजार मतांनी आघाडीवर आहेत. मावळमध्ये महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे २१ हजार ७८२ मतांनी आघाडीवर होते. शिरुर मतदारसंघात डॉ. अमोल कोल्हे यांना पाचवी फेरी संपली तेव्हा १ लाख २८ हजार ९८७ मते पडली होती, तर त्यांचे प्रतिस्पर्धी शिवाजीराव आढळराव पाटील यांना १ लाख ३ हजार ८९९ मते पडली.

सुरुवातीपासून मोहोळ यांनी पहिल्या फेरीपासून आघाडी घेतली आहे. पुणे लोकसभा मतमोजणीच्या पहिल्या फेरीत वडगाव शेरीत मुरलीधर मोहोळ यांना ६५८५, धंगेकर यांना ४३०१, शिवाजीनगरमध्ये मोहोळ यांना ३२४३, तर धंगेकर ४०३२, कोथरुडमध्ये ७९३१ आणि २६८५, पर्वती ३८९४ आणि ४२९४, कसबा ४६०४ आणि ५१९२, कँटमेंट ३११२ आणि ४१०० अशी मते होती. मोहोळ यांना २९,३६९ तर धंगेकर यांना २४,६०४ मते पडली. मोहोळ हे ४,७६५ मतांनी आघाडीवर होते.



### बारामतीला महत्त्व

- गेल्या वर्षभरात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्याने महाराष्ट्राने अस्थिर राजकीय परिदृश्य पाहिले. आता सर्वांचे लक्ष बारामतीकडे लागले आहे, जिथे शरद पवार गटाच्या तीन वेळा खासदार राहिलेल्या सुप्रिया सुळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यात लढत आहे. बारामतीत पहिल्यांदाच पवार विरुद्धात पवार रिंगणात आहेत. शरद पवार आणि अजित पवार राजकीय वर्चस्वासाठी लढत आहेत.
- बारामती मतदारसंघात पहिल्या पेरीत सुप्रिया सुळे यांना पडलेली मते पुढीलप्रमाणेः पुरंदर (५,१७५), बारामती (७,८८४), दौंड (४,०२६), इंदापूर (४,८३२) भोर (६,१७७), खडकवासला (५,१९१) अशी मते पडली. सुनेत्रा पवार यांना पुरंदर (५,१०४), बारामती (४,३४५), दौंड (३,८२३), इंदापूर (५,३५८), भोर (३,३७०), खडकवासला (४,५५२) अशी मते पडली.



## पवार, शिंदे, चव्हाण इनकमिंगचा प्रयोग भाजपला पडला महागात

# महाविकास आघाडीची अनपेक्षित सरशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रात अनपेक्षितपणे महायुतीला धक्के देत महाविकास आघाडीची सरशी होत असल्याचे चित्र मतमोजणीदरम्यान स्पष्ट होत आहे. भाजप आणि मित्रपक्षांना काही अनपेक्षित धक्के बसणार असल्याचे प्राथमिक संकेत मिळत आहेत. भाजपने एकनाथ शिंदे, अजित पवार व अशोक चव्हाण यांच्या इनकमिंगचा केलेला प्रयोग पक्षाच्या अंगलट येत असल्याचे यातून दिसून आले आहे.

साताऱ्यात उदयनराजे भोसले, बीडमध्ये पंकजा मुंडे, दिंडोरीत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार हे



भाजपचे प्रमुख उमेदवार पिछाडीवर पडले आहेत. राज्यातील ४८ जागांपैकी २७ जागांवर मविआ, १८ जागांवर महायुती तर ३ जागांवर इतर उमेदवार पहिल्या फेऱ्यांमध्ये विजयाच्या दिशेने जात आहेत. भाजपला ११, शिवसेनेला ६, राष्ट्रवादीला १, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) ९, काँग्रेस १० तर राष्ट्रवादी (शरद पवार गट) ९



असे साधारण ताजे चित्र आहे. मात्र जागा खालीवर होत असल्याने अंतिम चित्र कसे असेल याविषयी कमालीचे औत्सुक्य निर्माण झाले आहे. अतिशय संवेदनशील ठरलेल्या बीडमध्ये पंकजा मुंडे पाचव्या फेरीअखेर ८ हजार मतांनी पिछाडीवर आहेत, तर साताऱ्यात उदयनराजे भोसले सुमारे ४० हजार मतांनी प्रतिस्पर्धी



शशिकांत शिंदे यांच्यापेक्षा मागे पडले आहेत. राज्याची राजधानी मुंबई महायुती व महाआघाडी समसमान ३-३ जागांवर आघाडी टिकवून आहेत. धाराशिवमध्ये उद्धव ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर तब्बल ५३ हजार मतांनी तर माढ्यात शरद पवार गटाचे धैर्यशिल मोहिते पाटील सुमारे ११ हजार मतांनी पुढे आहेत.

शिर्डीत ठाकरे ग़टाचे भाऊसाहेब वाकचौरे शिवसेनेच्या सदाशिव लोखंडे यांच्यापेक्षा २ हजार मतांनी आघाडीवर आहेत. मावळ मतदार संघात शिवसेनेचे श्रीरंग बारणे पुन्हा एकदा लोकसभेची वाट चालताना दिसत आहेत. सर्वांचे लक्ष लागलेल्या सांगलीत अपक्ष विशाल पाटील २५ हजारपेक्षा जास्त मतांनी आघाडी मिळवून आहेत. नाशिकमध्ये ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे सुमारे ३० हजार मतांनी शिवसेनेच्या हेमंत गोडसे यांच्यापेक्षा पुढे आहेत. शेजारच्या दिंडोरीत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांना शरद पवार गटाचे भास्कर भगरे यांनी पिछाडीवर टाकले आहे. #रा


# रस्सीखेचात सातपुते आघाडीवर धैर्यशील भैय्या विजयाकडे

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पहिल्या फेरीपासून चढ उताराच्या गर्तेमध्ये असलेल्या सोलापूर आणि माढा लोकसभेच्या मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीला माढा येथे निर्विवाद यश मिळत असताना दिसत आहे.

सातवी फेरीमध्ये राम सातपुते यांनी ८३३८ मतांची आघाडी घेतली आहे. यामुळे काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांचे मताधिक्य घटले आहे. तर तिकडे धैर्यशील मोहिते पाटलांनी पहिल्या फेरी पासूनच आपला विजयी कौल दिला आहे विशेष म्हणजे माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या फलटण, माण, खटाव या भागात पहिल्याच फेरीमध्ये धैर्यशील मोहिते पाटील यांनी आघाडी घेतल्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

पहिल्या फेरीपासून चढ उताराच्या करते मध्ये असलेल्या सोलापूर आणि माढा



लोकसभेच्या मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीला निर्विवाद यश मिळत असताना दिसत आहे सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार प्रणिती ताई शिंदे यांनी सहाव्या फेरी अखेर १३ हजारांची आघाडी घेऊन विजयाकडे कूच केली आहे तर तिकडे धैर्यशील मोहिते पाटील आणि पहिल्या फेरी पासूनच आपला विजयी कौल दिला आहे विशेष म्हणजे माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर



यांच्या फलटण मान खटाव या भागातच पहिल्याच फेरीमध्ये धैर्यशील मोहिते पाटील यांनी आघाडी घेतल्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

अत्यंत चुरशीच्या आणि प्रतिष्ठेच्या चाललेल्या या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीने आपले सर्वस्व पणाला लावले होते तर महायुतीच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांनी ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली होती पणिती सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रभावा पुढे राम सातपुते आणि भाजपाच्या पाचही आमदारांचा प्रभाव कमी पडल्याचे स्पष्टपणे दिसून आले येथे कॉम्रेड सहित डावे पक्ष लिंगायत समाज दलित आणि मुस्लिम बहु समाजासह मध्यमवर्गीय समाजाने देखील काँग्रेसला मतदान केल्याचे स्पष्टपणे दिसत आहे तर पाचही विधानसभा मतदारसंघातील भाजपाचा प्रभाव निष्प्रभ करून सोलापूरकरांनी प्रणिती शिंदे यांना निर्विवाद यश देण्याचे ठरविले असल्याचे या कौल वरून दिसून येते.

माढा मध्ये देखील भाजपाच्या भ्रमाचा भोपळा फुटल्याचे दिसून येत असून तेथे नाईक निंबाळकर यांच्या अति आत्मविश्वासाची नाचक्की झाल्याचे दिसत आहे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी अत्यंत प्रतिष्ठेचा केलेली ही निवडणूक नाईक निंबाळकर यांच्या स्वभावामुळे आणि काही कार्यकर्त्यांच्या प्रचार प्रक्रियेमुळे संपुष्टात आल्याचे दिसते.



## पुणे

### पहिली फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| ४,७६५ मुरलीधर मोहोळ | ४,३०१ रवींद्र धंगेकर |

### दुसरी फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| २०,०७० | २७,९३४ |

### तिसरी फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| ८७१२२ | ६८२३० |

### चौथी फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| ८६७५ | ५१५३ |



## मावळ





### दुसरी फेरी


| महायुती | मविआ |
|---|---|
| ३०२२६ श्रीरंग बारणे | २७७६० संजोग वाघिरे |

### सातवी फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| ३०१०१ | २५१०६ |







## शिरुर

### पहिली फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| १७३१४ आढळराव पाटील | २३४०१ अमोल कोल्हे |

### चौथी फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| ८२५९० | १०११५९ |

## बारामती



### चौथी फेरी

| महायुती | मविआ |
|---|---|
| २४७७९ | ३२१३४ |